लोकमत

# मानवी संवेदनेला पर्याय असू शकत नाही

## न्यायाधीश जोशी । मानवधिकार, माहिती तंत्रज्ञान परिषदेचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे : सर्वच** क्षेत्रात माहिती आणि तंत्रज्ञानाने केलेला बदल परिणामकारक आहे. त्याचा प्रभाव आपण मान्य करायला हवा. तंत्रज्ञानामुळे काम सोपे झाले आहे. मात्र नव्या पिढीने त्याच्या जास्त आहारी न जाता आपली सदसद्विवेक बुद्धी जागृत ठेवून काम करावे. तंत्रज्ञानाची कास धरताना मानवी संवेदना जपणे महत्त्वाचे आहे. त्या मानवी मन आणि संवेदना यांना कुठल्याही प्रकारचा पर्याय उपलब्ध असू शकत नाही, असे मत उच्च न्यायालयाचे (नागपूर खंडपीठ) न्यायाधीश विनय जोशी यांनी व्यक्त केले.

मराठवाडा मित्र मंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयात तांत्रिक प्रगतीचे मानवी हक्कावर होणारे परिणाम या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपात ते बोलत होते. माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला कौटुंबिक न्यायालयाचे माजी अध्यक्ष व्ही. व्ही. शहापूरकर, कोलंबिया विद्यापीठाच्या संचालक प्रा. वसंता सेनेविराटने, विधी विभागाच्या प्रमुख प्रा. इंदिरा ननाय्याकारा, मराठवाडा मित्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य बी. जी. जाधव, शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. क्रांती देशमुख उपस्थित होते.

याप्रसंगी प्रा. सेनेविराटने यांनी सांगितले, की येत्या काळात कायदा आणि मानवधिकार यावर तंत्रज्ञानाचा होणारा परिणाम यावर अधिक काम होण्याची गरज आहे. प्रास्ताविक डॉ. देशमुख यांनी केले.

सूत्रसंचालन रेवती नाईक यांनी केले. तर आभार प्रताप साळुंखे यांनी मानले.

या परिषदेमध्ये श्रीलंकेच्या कोलंबो विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच भारतातील प्रमुख विधी महाविद्यालयातील व विद्यापीठातील प्राध्यापक व विद्यार्थी असे एकूण १७५ जण सहभागी झाले होते.

### तंत्रज्ञानाचा अतिरेक करू नका

- विनय जोशी म्हणाले, की कायद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली कायदाविषयक समज वाढविण्यासाठी वेगवेगळ्या कायदेविषयक पुस्तके तसेच प्रसिद्ध खटले यांचे निकालपत्र बारकाईने वाचायला हवे.


विनय जोशी

- न्यायदानाचे काम करताना जी सारासार विवेकबुद्धी, तर्कनिष्ठपणा आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मानवी संवेदनशीलता हवी असते ते काम यंत्राच्या साह्याने करता येणे कठीण आहे. निर्णय घेताना आणि आदेश देताना याचा उपयोग सर्वाधिक होतो. तंत्रज्ञान बदलाचे काही तोटेदेखील सहन करावे लागत आहे.
- सायबर क्राइम, हॅकर्स यांना रोखणे अवघड होत आहे. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा आधार घेताना त्यांनी त्याचा अतिरेकी वापर करू नये. जुन्या निकालांचा आधार घेताना ते मूळ निकाल अभ्यासण्याची गरज आहे.